अ. शा. पत्र क्रमांकापापु १००६/प्र.क्र.३८१/पापु-०७
पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : 28 सप्टेंबर, २००६

संजीव कुमार
सह सचिव

**विषय:- जिल्हा परिषदांमार्फत शासनाकडे**
**होणाऱ्या पत्रव्यवहाराबाबत**

प्रिय

जिल्हा परिषदांकडून शासनाकडे होणारा पत्रव्यवहार हा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने अथवा त्यांच्या मान्यतेने (स्थळ प्रतीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजूरी दिल्यानंतर शासनाकडे पाठवावयाच्या पत्रावर तशी नोंद करून) पत्र पाठविणे आवश्यक आहे. परंतु, माझ्या असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषदांच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून शासनाकडे करण्यात येणारा पत्रव्यवहार हा कार्यकारी अभियंत्यांच्या सहीने करण्यात येतो. त्या पत्रास संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची मान्यता घेण्यात आली आहे किंवा नाही याची नोंद पत्रावर नसते. त्यामुळे त्या पत्रास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची मान्यता आहे किंवा कसे याचा बोध होत नाही. यास्तव या पुढे जिल्हा परिषदेमार्फत शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास होणारा पत्रव्यवहार हा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या सहीने अथवा त्यांच्या मान्यतेने झालेला आहे अशी त्या पत्रावर नोंद करून केलेला असेल व त्या पत्राची soft copy ई-मेलव्दारे या विभागाच्या संबंधित अधिकाऱ्याच्या ई-मेल पत्त्यावर (विभागातील सर्व अधिकाऱ्यांचे ई-मेल पत्ते असलेली प्रत सोबत जोडली आहे.) पाठविली तरच त्या पत्राची शासनस्तरावर दखल घेतली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची वेबसाईट www.mahawssd.gov.in वर जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या नावे ईमेल खाते उघडण्यात आले असून त्याच्या USER ID व PASSWORD सोबत जोडले आहेत. तरी, आपल्या जिल्हयाच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना सदर ई-मेल पत्त्याचा नियमितपणे वापर करण्याच्या सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

**आपला**

संजीव कुमार 28/09/06

**(संजीव कुमार)**

**प्रति,**
**श्री.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:**

(१) प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
(२) विभागीय आयुक्त (सर्व)
(३) उप सचिव (श्री.पतिंगे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
(४) विशेष कार्य अधिकारी (श्री.कल्याणकर), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
(५) उप सचिव (श्री.सुर्वे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
(६) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील इतर सर्व अधिकारी
(७) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
(८) माहिती व्यवस्थापन व समन्वयक अधिकारी, संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.